# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## पर्यटन विभाग

जा.क्र/मनपा/पर्यटन /2026/104 दिनांक:- 19/ 08 / 2026

### दरपत्रक सुचनापत्र

प्रती,

------------------------------------

------------------------------------

विषय :- खालील नमुद केल्यानुसार दरपत्रक सादर करणे बाबत.

वरीलप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, पर्यटन विभाग यांना खाली नमूद केल्यानुसार व दिलेल्या विवरणानुसार / प्रत्यक्ष दिलेल्या सुचनेनुसार फोटो व व्हिडिओग्राफी करणे आहे.

| अ. क्र. | विवरणाचे / साहित्याचे नांव निकषासह | प्रमाण | दर सर्व करांसहित प्रती नग दर |
|---|---|---|---|
| 1 | फोटो - कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी फोटो काढणे. | 4 ×6 इंच | |
| 2 | **व्हिडिओग्राफी**- पर्यटन विभागाच्या हेरिटेज वॉक आणि संबंधित कार्यक्रमांचे सोशल मीडिया व वृत्तवाहिन्यांवर प्रसिद्धीसाठीचे नियोजन खालीलप्रमाणे राहील.<br>**कार्यक्रमापूर्वी (Pre-Event Publicity)**<br>▯ टीझर व्हिडिओ आणि पोस्टर्स:- आगामी हेरिटेज वॉक किंवा बैठकीची माहिती देणारा एक छोटा व्हिडिओ (टीझर) आणि आकर्षक डिझाईन केलेले दोन पोस्टर तयार करणे.<br>▯ सोशल मीडिया व्हिडिओ:- व्हॉट्सअॅप स्टेटस, इंस्टाग्राम आणि फेसबुक रिल्सच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत कार्यक्रमाची तारीख, वेळ आणि ठिकाण पोहोचविणे.<br>▯ इलेक्ट्रॉनिक मीडिया (वृत्तवाहिन्या):- कार्यक्रमाच्या पूर्व-प्रसिद्धीसाठी स्थानिक आणि प्रमुख न्यूज चॅनेल्सना प्रसिद्धी पत्रक (Press Note) आणि माहिती व्हिडिओ पाठविणे.<br>**पर्यटन कार्यक्रम (Event)**<br>▯ लाईव्ह कव्हरेज व व्हिडिओग्राफी:- हेरिटेज वॉक आणि मुख्य बैठकांचे उच्च दर्जाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे. तसेच फेसबुक आणि इंस्टाग्रामवर महत्त्वाचे क्षण 'लाईव्ह' (Live) प्रक्षेपित करणे.<br>▯ हायलाईट्स व्हिडिओ (Aftermovie):- संपूर्ण कार्यक्रमाचा एक सुंदर आणि माहितीपूर्ण 'हायलाईट्स व्हिडिओ' तयार करून तो व्हॉट्सअॅप ग्रुप्स, इंस्टाग्राम आणि फेसबुक पेजवर अपलोड करणे.<br>▯ मुलाखती:- इतिहासतज्ज्ञ, मार्गदर्शक (Guides) आणि पर्यटकांच्या प्रतिक्रियांचे छोटे व्हिडिओ क्लिप्स तयार करणे<br>**कार्यक्रमानंतर (Post-Event Publicity)**<br>▯ वृत्तवाहिन्यांवर प्रसारण:- इलेक्ट्रॉनिक न्यूज चॅनेल्सना कार्यक्रमाच्या व्हिडिओ क्लिप्स आणि सविस्तर बातमी प्रसिद्धीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात देणे.<br>▯ पर्यटन विभागाच्या उपक्रमांचा प्रचार आणि प्रसार प्रभावीपणे करणे. तसेच काढलेल्या फोटोसहीत वॉक बाबतचे दस्ताऐवजीकरण करुन तो अहवाल पर्यटन विभागास अंतिम करण्यास्तव सादर करणे. | टीझर व्हिडिओ, सोशल मीडिया व्हिडिओ, हायलाईट्स व्हिडिओ, प्रति इव्हेंट. | |

सदर साहित्याचे दरपत्रक सिलबंद करुन दिनांक 21/08/2026 पर्यंत पर्यटन विभागात सादर करावे. वेळेच्या आत न आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

Digitally signed by
Rutuja Jayawantrao Patil
Date: 12-08-2026
10:49:24

सहाय्यक आयुक्त, (पर्यटन विभाग)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Digitally signed by
Hansraj Narayan Banswal
Date: 11-08-2026
18:27:35

प्रत :-1.मा. अतिरिक्त आयुक्त-1, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना माहितीस्तव सविनय सादर.

2.मा. उपआयुक्त, पर्यटन विभाग प्रमुख,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना माहितीस्तव सविनय सादर

3.सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, यांना मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.